# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १२४/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सायबाण्णा शरणाप्पा वालेकर,<br>मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सायबाण्णा शरणाप्पा वालेकर, मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २४.१०.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. २४६ येथे शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे अर्ज केला. त्यासाठी भरावे लागणारे प्रासेसिंग फी रु. ५०/- दि. ६.४.२०११ ला पावती क्र. ०२०१७५३ नुसार भरले. अर्जदार ग्राहकाने चलन न मिळाल्याने प्रथम अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे व नंतर मंचाकडे दाखल केले आहे. चलन देणेस विलंब झालेचे निश्चित झाल्यामुळे विलंबाबत ग्राहक भरपाईची मागणी वेगळी करत आहे. ग्राहकास वि.प.ने चलन दि. २०.१०.२०११ रोजी दिले आहे, प्रत्यक्षात ते वितरण वाहिनीचा विस्तार असलेने दि. ५.५.२०११ रोजी मिळणे आवश्यक होते. मंचाकडून अपेक्षित मदत - चलन मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ५.११.२०११ च्या लेखी अहवालात ग्राहकाचा अर्ज दि. ६.४.२०११ ला प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे. सदर ग्राहकास चलन देणेसाठी अंदाजपत्रक दि. २८.४.२०११ रोजी उप विभागाकडून तयार करण्यात आले होते. तांत्रिकदृष्ट्या मंजुरी योग्य नसलेने पूर्ततेसाठी अंदाजपत्रक कवठे महांकाळ विभागाकडून दि. १३.५.२०११ रोजी फेरमंजुरीसाठी उप विभागास पाठविण्यात आले. त्यानुसार अंदाजपत्रक दि. १५.१०.२०११ रोजी मंजुरीसाठी पाठविण्यात आले व दि. २०.१०.२०११ ला मंजूर झाल्यानंतर अर्जदार ग्राहकास त्याचदिवशी चलन देण्यात आले. ग्राहकास उच्चदाब वाहिनी ०.०६ कि.मी., लघुदाब वाहिनी ०.४८ कि.मी. व एक ६३ केव्हीएचा रोहित्र मंजूर असल्याने ग्राहकास चांगल्या दर्जाचा वीज पुरवठा मिळणार आहे. सदर बाब विचारात घेवून ग्राहकास नुकसान भरपाई देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. १०.१.२०१२ रोजी घेण्यात आली. ग्राहक प्रतिनिधी उपस्थित. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता, श्री. कदम, कनिष्ठ अभियंता श्री. अे.के. कुलकर्णी उपस्थित. ग्राहक प्रतिनिधींनी सुरक्षित वीज पुरवठा ठराविक मुदतीत झालेस ग्राहक भरपाई रु. २०००/- सोडून देण्यास तयार आहे असे सांगितले. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले आहे. ग्राहकाचे ८ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम आहे. ग्राहकाची कामें पूर्ण करुन त्यांना दि. १०.२.२०१२ पूर्वी वीज जोडणी देण्यात येईल भरपाईची मागणी मंजूर करण्यात येवू नये अशी मागणी केली.

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार चलन देण्यास विलंब झाला आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंबासाठी दिलेली कारणे ग्राह्य धरता येणार नाही. ग्राहक प्रतिनिधींनी ग्राहकास सुरक्षित वीज पुरवठा ठराविक मुदतीत मिळाल्यास भरपाई रु. २०००/- सोडून देण्यास ग्राहक तयार असल्याचे सांगितले आहे. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. १०.२.२०१२ पूर्वी लघुदाब वाहिनीचे काम करुन ग्राहकास वीज जोडणी देण्यात येईल असे मंचासमोर लेखी लिहून दिले त्यामुळे ग्राहकाची विलंबापोटी भरपाईची मागणी निकाली काढणे योग्य होईल. यदाकदाचित वि.प.ने मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे दि. १०.२.२०१२ पर्यंत वीज जोडणी दिली नाही तर ग्राहक भरपाईची मागणी करु शकतो. खालील प्रमाणे आदेश -

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकास दि. ५ महिन्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. २०००/- भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

३) वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर लेखी लिहून दिल्याप्रमाणे दि. १०.२.२०१२ पूर्वी लघुदाब वाहिनी उभी करुन ग्राहकास नवीन वीज जोडणी दिल्यास ग्राहकाने भरपाई मागणीचा हक्क सोडून दिला आहे. भरपाईच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येवू नये असे मंच आदेश देत आहे. यदाकदाचित दि. १०.२.२०१२ पूर्वी लघुदाब वाहिनी उभी करुन ग्राहकास नवीन वीज जोडणी न दिल्यास ग्राहक भरपाई रक्कम मिळण्यास हक्कदार आहे.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com